# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १४.०७.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (०८.०७.२०२६ ते १४.०७.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१५.०७.२०२६ ते १९.०७.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | दिनांक | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| २५.६ | २२.० | ०.६ | २.४ | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ३ | ४ | ६ | ८ | ९ |
| २६.५ | २७.० | २८.२ | २९.५ | २९.२ | २९.८ | २९.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३० | ३० | २९ | २९ |
| २३.४ | २१.८ | २३.५ | २३.० | २३.२ | २३.२ | २२.६ | किमान तापमान (अं.से.) | २३ | २३ | २४ | २४ | २४ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ५ | ६ | स. ढग स्थिती (आकाश) | ७ | ४ | ६ | ८ | ८ |
| ८ | ८ | ८ | ६ | ८ | ६ | ८ | दु. | | | | | |
| ९५ | ९२ | ८७ | ९१ | ९२ | ८९ | ८७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९४ | ९५ | ९६ | ९६ | ९४ |
| ९२ | ८९ | ७९ | ७२ | ६७ | ७२ | ६३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६५ | ७० | ७२ | ७५ | ७६ |
| १०.२ | ६.७ | ६.५ | ६.० | ६.८ | ७.५ | ६.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १५ | १३ | १३ | ११ | १५ |
| प. | प.नै. | नै. | नै. | प.नै. | प. | नै. | स. वाऱ्याची दिशा | प. | प.नै. | प.नै. | प.नै. | प. |
| वा. | नै. | प. वा. | द.नै. | वा. | नै. | द.नै. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ५०.६ | ४३८.२ | २१ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १५, १६ ,१७, १८ व १९ जुलै रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील घाट भागात १५, १६ ,१७, १८ व १९ जुलै रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या तसेच मध्य व पूर्व भागात १५, १६ ,१७, १८ व १९ जुलै रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १९ जुलै पर्यंत कमाल तापमान २९.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २३.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ९४ ते ९६%, दुपारची सापेक्ष आद्रता ६५ ते ७६% तसेच वाऱ्याचा वेग ताशी १३ ते १५ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १७ ते २३ जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ लवकर पेरणी केलेल्या भात, मका, ज्वारी, भुईमूग, सोयाबीन इ. खरीप पिकांना आवश्यकतेनुसार संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी |
| संदेश | | जमिनीमध्ये वाफसा असल्यासच १५ जुलै पर्यंत पेरणी करावी. पेरणी शक्यतो बिबीएफ पद्धतीने किंवा सरी ओरंब्यावर करावी |
| भात | पुनर्लागवड | ➢ ज्या भागामध्ये पुनर्लागवड झालेली आहे अश्या ठिकाणी भात पिकास संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी<br>➢ ज्या ठिकाणी पुरेश्या पाण्याअभावी पुनर्लागवड थांबली आहे त्या ठिकाणी भात रोपवाटीकेतील रोपांना प्रती गुंठा अर्धा किलो युरियाची अतिरिक्त मात्रा द्यावी किंवा १ % युरियाची फवारणी करावी<br>➢ जर भात रोपलागणीचा कालावधी ३० दिवसापेक्षा जास्त असेल तर रोप लागण करताना रोपांची संख्या एका चूडामध्ये ३ ते ४ एवढी ठेवावी |
| नाचणी | पेरणी | ➢ नाचणी पीक २ ते ३ पानांच्या अवस्थेत आहे. पिकाच्या गरजेनुसार संरक्षक सिंचन द्यावे.<br>➢ १५ जुलैनंतर नाचणीची पेरणी टाळावी. |
| खरीप ज्वारी | पेरणी | ➢ वाफसा असल्यास पेरणी पूर्ण करावी. लवकर पेरणी केल्यास खोडमशीचा उपद्रव कमी होतो. बीजप्रक्रिया : खरीप ज्वारीस १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझोटोबॅक्टर किंवा २५० ग्रॅम अॅझोस्पिरीलम हे जिवाणू खत चोळावे. त्यामुळे १५ ते २० टक्के उत्पादन वाढते.<br>➢ खत मात्रा : हेक्टरी ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश द्यावे. यापैकी नत्राची अर्धी मात्रा तसेच स्फुरद व पालाशाची संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळी द्यावी. |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| मका | वाढीची | ➢ लवकर पेरणी केलेल्या मका पिकास संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी.<br>➢ पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी फुले सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-II ची फवारणी करावी.<br>➢ ज्या शेतांमध्ये लवकर पेरणी झालेली असून पानांवर पिवळेपणा दिसून येत असेल, त्या ठिकाणी नत्राची कमतरता भरून काढण्यासाठी व पिकाची वाढ सुधारण्यासाठी १% युरियाची फवारणी करावी.<br>➢ पेरणीनंतर १० ते १२ दिवस पूर्ण झाल्यास आवश्यकतेनुसार विरळणी करावी.<br>➢ कीटकांच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकर ५ कामगंध सापळे लावावेत.<br>➢ ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता असेल त्याच ठिकाणी लवकरात लवकर ७५ x २० सेमी अंतरावर सरी ओरंब्यावर मक्याची लागवड करावी. लागवडीवेळी ३५ किलो युरिया, १५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट व २८ ते ३० किलो म्युरेट ऑफ पोटाश ही खते द्यावी या बरोबरच एकरी १०किलो झिंक सल्फेट या सुक्षम अन्नद्रव्याचा वापर करावा. पेरणी नंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी अॅट्राझीन प्रती एकर ५०० ग्रॅम १५० ते २०० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ सुरू ऊसामध्ये ज्या ठिकणी पोक्का बोइंगचा प्रादुर्भाव आलेला आहे आणि जमिनीमध्ये ओलावा आहे अश्या ठिकाणी एकरी २ किलो ट्रायकोडर्मा ४० किलो गांडूळखतामध्ये किंवा २० किलो चांगल्या शेणखतामध्ये मिसळून दिल्यास चांगले नियंत्रण होते.<br>➢ आडसली उस लागवड करण्यासाठी पूर्वमशागतीची कामे करून घ्यावी<br>➢ आडसली उस लागवड करण्यासाठी उस रोपे तयार करण्यासाठी हा कालावधी उत्तम राहील<br>➢ पुरेसा पाऊस झाल्यानंतरच एक डोळा रोपांपासून (३० ते ४५ दिवस वयाच्या रोपांची ) ऊस लागवड करू शकतात त्यामुळे नेहमीच्या तुलनेत ऊस लागणीस ३० ते ४५ दिवसांपर्यंत जोपासण्यासाठी लागणारे पाणी, तण नियंत्रण, खते,देखरेख यांची बचत होते. काही वेळेस अगोदरचे पिक काढणीस उशीर होतो अश्या वेळेस रोपे तयार करून वेळेवर उसाची लागवड करता येते. |
| सोयाबीन | पेरणी/ वाढीची | ➢ ज्या ठिकाणी वाफसा आला आहे त्या ठिकाणी १५ जुलै पूर्वी पेरणी करावी. पेरणी बिबीएफ पद्धतीने किंवा सरी ओरंब्यावर करावी<br>➢ लवकर पेरणी केलेल्या सोयाबीन पिकास संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी.<br>➢ पेरणीनंतर २० ते २५ दिवस झाले असल्यास कोळपणी व खुरपणीची कामे करून तण नियंत्रण करावे. |
| भुईमूग | पेरणी/ वाढीची | ➢ शेतात पुरेसा ओलावा (वाफसा) असल्यासच दिनांक १५ जुलैपर्यंत पेरणीची कामे पूर्ण करावीत.<br>➢ लवकर पेरणी केलेल्या भुईमूग पिकास संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी. |
| मिरची | वाढीची | ➢ मिरची पिकास संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी.<br>➢ मागील आठवड्यामध्ये पाऊस, वाढलेली आद्रता यांमुळे मिरची पिकावर चुरडा मुरडा या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या रोगाचा प्रसार फुलकिडे, मावा आणि कोळी या रस शोषून घेणाऱ्या किडीमार्फत होतो. ह्या किडी पानातील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पानाच्या शिरामधील भागावर सुरकुत्या पडून संपूर्ण पानांची वाढ खुंटते आणि झाड रोगट दिसते.<br>➢ मावा किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८% एस. एल. प्रति २.५ मिली / १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी फिप्रोनील ५ एस.सी. २० मिली. आणि कोळीच्या नियंत्रणासाठी फेनॅक्झाक्विन १० ईसी. २५ मिली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| पशुधन | वाढीची | ➢ जनावरांचे शेड कोरडे ठेवावे.<br>➢ जनावरांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी द्यावे<br>➢ जनावरांना कोवळा हिरवा चारा जास्त प्रमाणात खाऊ घालू नये.<br>➢ जनावरांच्या आहारामध्ये योग्य प्रमाणात वाळलेल्या चाऱ्याचा वापर करावा.<br>➢ पावसाळ्यात मेंढ्यांच्या खुरामध्ये चिखल्या होतात तेव्हा पशुवैद्यकाच्या सल्ल्याने मेंढया महिन्यातून एकदा कॉपर सल्फेट किंवा फॉरमॅल्डीहाईड द्रावण असलेल्या उथळ हौदातून संपूर्ण खुर बुडतील अश्या सोडाव्यात. |

| | |
|---|---|
| मेघदूत अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १४.०७.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर